जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

20 JUN 2025

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्त्वाचे: डॉ. अभय बंग

## शिवाजी विद्यापीठात तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस प्रारंभ

कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ):

लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वत:च्या परीघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत डॉ. अभय बंग यांनी आज येथे केले.




शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आजपासून अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीनदिवसीय संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषण करताना डॉ. बंग बोलत होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अभय बंग यांचे लोकांसमवेत संशोधन' या विषयावर अतिशय प्रबोधक बीजभाषण झाले. संख्याशास्त्रज्ञांसह सर्वच संशोधकांसाठी त्यांनी आपल्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, अॅक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेमध्ये केलेल्या आदिवासी समाजाच्या विविध आरोग्यविषयक प्रयोग व प्रकल्पांमध्ये संख्याशास्त्र कसे उपयुक्त ठरत गेले, याविषयी सादरीकरण केले. ते म्हणाले, व्यापक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने संख्याशास्त्राचा वापर केला जाणे गरजेचे आहे. संशोधकांनी सुविधांनी सुसज्ज ठिकाणी जाण्याऐवजी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. तिथे समस्या सोडवणुकीच्या अनेक शक्यता सामोऱ्या येतात. लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, निरीक्षण केले पाहिजे, व्यापक माहिती मिळविण्यासह त्या माहितीचे विश्लेषण केले पाहिजे. त्यातून उपयुक्त संशोधन साकार होते. ज्ञान ही आजघडीची सर्वात महत्त्वाची संपत्ती आहे. आज संशोधकाला संशोधन निधी, लोकप्रियता या बाबी मोठ्या प्रमाणात मिळतात, पण या साऱ्या भोवतालात लोकांचे काय, हा प्रश्न घेऊन जो उभा राहतो, तो खरा संशोधक असतो. त्यामुळे लोकांविषयी संशोधन, लोकांसाठी संशोधन हे दोन टप्पे योग्य आहेत, पण परिपूर्ण नव्हेत. त्यापुढे जाऊन संशोधकांनी लोकांसमवेत संशोधन हा मार्ग स्वीकारला पाहिजे. त्यातून भरीव असे काही हाती लागू शकेल. त्याही पुढे जाऊन लोकांकडून संशोधन हा सर्वात आदर्श टप्पा मानला पाहिजे, पण हा पल्ला अद्यापही खूप दूरचा आहे. मात्र, तो लवकरच साकार होईल, या विषयी आपण सकारात्मक, आशावादी असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांच्या हिंद स्वराज, ग्राम स्वराज या पुढे जाऊन या देशामध्ये आरोग्य स्वराज निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, सर्च हा अतिमहत्त्वाचा समाजाभिमुख उपक्रम आहे. तिथे आदिवासींच्या आरोग्याविषयी मूलभूत संशोधन केले जाते. अगदी गुडघेदुखी, पाठदुखीविषयीही काळजी वाहिली जाते. कारण हे अवयव आदिवासी समाजाच्या थेट मिळकतीशी संबंधित आहेत. त्यामुळे या व्याधींनी ग्रस्त व्यक्तीला वेदनाशामक औषधाऐवजी जागृती आणि शारीर उपचारांनी बरे करण्याकडे कल असतो. हे बंग दांपत्याच्या समाजस्वास्थ्य कार्याचे वेगळेपण आहे.

आपल्या उद्घाटनपर मनोगतामध्ये ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने या क्षेत्रातील दिग्गज व्यक्तीमत्त्वांचे येणे महत्त्वाचे आहे. परिषदेमध्ये सहभागी नवसंशोधक, अभ्यासकांना या सर्वांशी संवाद साधण्याची मोठी संधी प्राप्त झाली आहे. तिचा त्यांनी लाभ घ्यावा. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाचे संख्याशास्त्रज्ञ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे समकाळातील एक महत्त्वाचे संशोधक आहेत. त्यांचा या निमित्ताने होत असलेला सन्मानही खूप महत्त्वाचा आहे.

यावेळी सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख तथा परिषद समन्वयक डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

20 JUN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकांचे प्रश्न घेऊन उभा राहतो, तो खरा संशोधक

## डॉ. अभय बंग : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १९ : 'संशोधकाला आज संशोधन निधी, लोकप्रियता या बाबी मोठ्या प्रमाणात मिळतात. पण, या साऱ्या भोवतालात लोकांचे काय, हा प्रश्न घेऊन जो उभा राहतो, तो खरा संशोधक असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आजपासून 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथडस्, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीनदिवसीय संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषण करताना डॉ. बंग बोलत होते. अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. अभय बंग. यावेळी डावीकडून डॉ. शशिभूषण महाडिक, डॉ. डी. टी. शिर्के, प्रकाश पाटील, सोमनाथ पवार.

डॉ. बंग यांनी संख्याशास्त्रज्ञांसह सर्वच संशोधकांसाठी, त्यांनी आपल्या गडचिरोली येथील सर्च या संस्थेमध्ये आदिवासी समाजाच्या संदर्भात केलेले विविध आरोग्यविषयक प्रयोग व प्रकल्पांमध्ये संख्याशास्त्र कसे उपयुक्त ठरत गेले, याविषयी सादरीकरण केले. ते म्हणाले, 'संशोधकांनी सुविधांनी सुसज्ज ठिकाणी जाण्याऐवजी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यातून उपयुक्त संशोधन साकार होते. लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वतःच्या परीघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे.'

ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, 'सर्च हा अतिमहत्त्वाचा समाजाभिमुख उपक्रम आहे. तिथे आदिवासींच्या आरोग्याविषयी मूलभूत संशोधन केले जाते. हे बंग दांपत्याच्या समाजस्वास्थ्य कार्याचे वेगळेपण आहे.' डॉ. पाटील म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाचे संख्याशास्त्रज्ञ कुलगुरू डॉ. शिर्के हे समकालातील एक महत्त्वाचे संशोधक आहेत. त्यांचा या परिषदेच्या निमित्ताने होत असलेला सन्मानही खूप महत्त्वाचा आहे.' संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

20 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संख्याशास्त्रज्ञांनी परिघाबाहेरील समस्यांचा शोध घ्यावा

## डॉ. अभय बंग : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस झाला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वतःच्या परिघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत डॉ. अभय बंग यांनी गुरुवारी केले.




शिवाजी विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात डॉ. अभय बंग यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. शशीभूषण महाडिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रकाश पाटील आणि डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीनदिवसीय संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. त्यावेळी डॉ. बंग बोलत होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बंग म्हणाले, व्यापक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने संख्याशास्त्राचा वापर केला जाणे गरजेचे आहे. संशोधकांनी सुविधांनी सुसज्ज ठिकाणी जाण्याऐवजी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, संशोधन हा अतिमहत्त्वाचा समाजाभिमुख उपक्रम आहे. तिथे आदिवासींच्या आरोग्याविषयी मूलभूत संशोधन केले जाते. डॉ. प्रकाश पाटील, कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले. समन्वयक डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले.

Times of India

# Activist tells researchers to use statistics for social good

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Senior social activist Dr Abhay Bang told attendees at the inaugural speech of the 'International Conference on Statistics' at SUK that statisticians must go beyond their own sphere and investigate social problems.


Dr Bang spoke on the topic of 'Research with People'. He gave a presentation to all researchers, including statisticians, on how statistics was useful in various health experiments conducted in the context of tribal communities at his organisation, Society for Education, Action and Research in Community Health (SEARCH), Gadchiroli.

Dr. Bang said, "Statistics should be used for broader social welfare. Researchers need to give priority to going to places where there are problems instead of going to places with facilities. People should be observed, and that information should be analysed along with obtaining comprehensive information."

In the inaugural address, senior statistician Dr Prakash Patil said, "It is important that eminent personalities in statistics have come to Shivaji University, Kolhapur (SUK) for the conference. The innovative researchers participating in the conference have got a great opportunity to interact with all of them."

After the inaugural session, senior statistician Dr Anil Gore gave a lecture on the topic of 'Jatayu Fails Again', whereas Dr Prakash Patil spoke on the topic of 'On Parametrically Guided Non-Parametric Estimation'.

TOI



Social activist Dr Abhay Bang addresses the participants at International Conference on Statistics at the SUK

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्वाचे

## डॉ. अभय बंग यांचे प्रतिपादन : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वत:च्या परीघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अभय बंग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारपासून 'अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स'वरील संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते परिषदेच्या स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले.




**कोल्हापूर : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत उद्घाटनप्रसंगी स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. अभय बंग. सोबत डॉ. शशीभूषण महाडिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. सोमनाथ पवार**

डॉ. बंग म्हणाले, व्यापक सामाजिक कल्याणाच्यादृष्टीने संख्याशास्त्राचा वापर होणे गरजेचे आहे. संशोधकांनी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, निरीक्षण केले पाहिजे, व्यापक माहिती मिळवण्यासह त्या माहितीचे विश्लेषण केले पाहिजे. त्यातून उपयुक्त संशोधन साकार होते.

संशोधकाला संशोधन निधी, लोकप्रियता या बाबी मोठ्या प्रमाणात मिळतात, पण या भोवतालात लोकांचे काय, हा प्रश्न घेऊन जो उभा राहतो, तो खरा संशोधक. त्यामुळे लोकांविषयी संशोधन, लोकांसाठी संशोधन हे दोन टप्पे योग्य आहेत, पण परिपूर्ण नव्हेत. त्यापुढे जाऊन संशोधकांनी लोकांसमवेत संशोधन हा मार्ग स्वीकारला पाहिजे. पुढे जाऊन लोकांकडून संशोधन हा सर्वात आदर्श टप्पा मानला पाहिजे, महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज यापुढे जाऊन आरोग्य स्वराज निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, सर्च हा अतिमहत्त्वाचा समाजाभिमुख उपक्रम आहे. तिथे आदिवासींच्या आरोग्याविषयी मूलभूत संशोधन केले जाते. अगदी गुडघेदुखी, पाठदुखीविषयीही काळजी वाहिली जाते. कारण हे अवयव आदिवासी समाजाच्या थेट मिळकतीशी संबंधित आहेत. त्यामुळे या व्याधींनीग्रस्त व्यक्तीला वेदनाशामक औषधाऐवजी जागृती आणि शरीर उपचारांनी बरे करण्याकडे कल असतो.

डॉ. प्रकाश पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने या क्षेत्रातील दिग्गजांचे येणे महत्त्वाचे आहे. परिषदेमध्ये सहभागी नवसंशोधक, अभ्यासकांना या सर्वांशी संवाद साधण्याची संधी प्राप्त झाली आहे. विद्यापीठाचे संख्याशास्त्रज्ञ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे समकाळातील एक महत्त्वाचे संशोधक आहेत. त्यांचा या निमित्ताने होत असलेला सन्मानही खूप महत्त्वाचा आहे. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख तथा परिषद समन्वयक डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

20 JUN 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्त्वाचे साधन

## डॉ. अभय बंग : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वतःच्या परिघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत डॉ. अभय बंग यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. अभय बंग. व्यासपीठावर डॉ. शशीभूषण महाडिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. सोमनाथ पवार.** (छाया : अर्जुन टाकळकर)

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीन दिवसीय संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. यावेळी बीजभाषण करताना ते बोलत होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बंग यांचे 'लोकांसमवेत संशोधन' या विषयावर बीजभाषण झाले. ते म्हणाले, व्यापक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने संख्याशास्त्राचा वापर केला जाणे गरजेचे आहे. संशोधकांनी सुविधांनी सुसज्ज ठिकाणी जाण्याऐवजी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. तिथे समस्या सोडवणुकीच्या अनेक शक्यता सामोऱ्या येतात. लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, निरीक्षण केले पाहिजे. महात्मा गांधी यांच्या हिंद स्वराज, ग्राम स्वराज यापुढे जाऊन देशात आरोग्य स्वराज निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

डॉ. प्रकाश पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने या क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांचे येणे महत्त्वाचे आहे. परिषदेत सहभागी नवसंशोधक, अभ्यासकांना संवाद साधण्याची संधी प्राप्त झाली आहे. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे यांनी मनोगत व्यक्त केले. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

20 JUN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्त्वाचे

**डॉ. अभय बंग**

## शिवाजी विद्यापीठात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस प्रारंभ



। कोल्हापूर : प्रतिनिधी

लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे संख्याशास्त्रज्ञांनी स्वतःच्या परिघाबाहेर जाऊन सामाजिक समस्यांचा शोध आणि वेध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत डॉ. अभय बंग यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरुवारपासून 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथडस्, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीनदिवसीय संख्याशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषण करताना डॉ. बंग बोलत होते. अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अभय बंग यांचे 'लोकांसमवेत संशोधन' या विषयावर अतिशय प्रबोधक बीजभाषण झाले. संख्याशास्त्रज्ञांसह सर्वच संशोधकांसाठी त्यांनी आपल्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेमध्ये आदिवासी समाजाच्या संदर्भात केलेले विविध आरोग्यविषयक प्रयोग व प्रकल्पांमध्ये संख्याशास्त्र कसे उपयुक्त ठरत गेले, याविषयी सादरीकरण केले. ते म्हणाले, व्यापक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने संख्याशास्त्राचा वापर केला जाणे गरजेचे आहे. आज संशोधकाला संशोधन निधी, लोकप्रियता या बाबी मोठ्या प्रमाणात मिळतात; पण या साऱ्या भोवतालात लोकांचे काय, हा प्रश्न घेऊन जो उभा राहतो, तो खरा संशोधक असतो.

यावेळी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, सर्च हा अतिमहत्त्वाचा समाजाभिमुख उपक्रम आहे. तिथे आदिवासींच्या आरोग्याविषयी मूलभूत संशोधन केले जाते. उद्घाटनपर मनोगतामध्ये ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश पाटील म्हणाले, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे समकाळातील एक महत्त्वाचे संख्याशास्त्रज्ञ आहेत. त्यांचा होत असलेला सन्मानही खूप महत्त्वाचा आहे.

यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख तथा परिषद समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

सकाळ

■ **आंतरराष्ट्रीय परिषद :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. के. शिर्के यांच्या सन्मानार्थ संख्याशास्त्रावरील आंतरराष्ट्रीय परिषद. स्थळ : राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी दहा

20 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘ऑफलाईन’ने वाढली प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

## विद्यापीठातील ५० टक्के जागा भरल्या; कॅम्पसवरील अधिविभागांना मिळाले बळ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाने गेल्या दोन दिवसांत घेतलेल्या ऑफलाईन प्रवेश फेरीमुळे विद्यापीठ कॅम्पसमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. दुसऱ्या फेरीअखेर विद्यापीठातील प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागा भरल्या आहेत. त्याने कॅम्पसवरील अधिविभागांना चांगले पाठबळ मिळाले आहे.

प्रवेशाबाबतची ऑनलाईन प्रक्रिया योग्यरीतीने समजली नसल्याने विद्यार्थ्यांच्या पातळीवर असलेली गोंधळाची स्थिती आणि ती दूर करण्यासाठी ऑफलाईन प्रवेश फेरी घेण्याचा मुद्दा ‘सकाळ’ने १३ जूनच्या अंकात ‘विद्यार्थ्यांपेक्षा त्रुटींचा जास्त ‘प्रवेश’ या वृत्तातून मांडला. त्याची आणि कॅम्पसवरील काही अधिविभागांनी केलेल्या मागणीची दखल विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीने घेतली.



विद्यार्थ्यांपेक्षा त्रुटींचा जास्त ‘प्रवेश’



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी झालेल्या ऑफलाईन प्रवेश फेरीसाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली.

या समितीने १८ आणि १९ जून रोजी ऑफलाईन प्रवेशफेरी घेण्यास संबंधित अधिविभागांना मान्यता दिली. त्यानुसार या दोन दिवसांमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, गणित, योगशास्त्र, अर्थशास्त्र, आदी अधिविभागांनी सकाळी अकरा ते सायंकाळी सहा यावेळेत ऑफलाईन फेरीची प्रक्रिया राबविली. त्यात अधिविभागांतील प्रवेश प्रक्रिया समितीने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, विद्यापीठातील सुविधांची माहिती दिली. त्यांच्या शंकांचे निरसन केले. तांत्रिक अडचणी, त्रुटी दूर करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. या ऑफलाईन फेरीमुळे प्रवेश निश्चित करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सहाशे इतकी भर पडली आहे. कॅम्पसवरील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी यापुढील प्रक्रियेत ऑनलाईनबरोबरच ऑफलाईन फेरीचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे उपयुक्त आणि सोयीस्कर ठरणार आहे.

### पुनर्परीक्षा प्रवेश परीक्षा, ऑफलाईन फेरी हवी

■ या दोन दिवसांत आयोजित केलेल्या ऑफलाईन फेरीची माहिती मिळण्यास विलंब झाल्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अद्याप ४० टक्के विद्यार्थी प्रवेशित झालेले नाहीत. बी.एस्सी भाग एक, दोन, तीनच्या ३० ते ३५ टक्के विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाले नसल्याने ते प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेले नाहीत. या विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीने काही अभ्यासक्रमांसाठी पुनर्परीक्षा आणि एखादी ऑफलाईन फेरी घेणे आवश्यक आहे.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- प्रवेश प्रक्रिया सुरू असलेले एकूण अभ्यासक्रम - ४७
- प्रवेश क्षमता - २१७०
- अर्ज भरलेले विद्यार्थी - ५४५५
- प्रवेश परीक्षा दिलेले विद्यार्थी - ३७३७
- आतापर्यंत प्रवेश निश्चित केलेले विद्यार्थी - १६०७

“ ‘ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी सोयीस्कर ठरणारी आहे. मात्र, ती अधिकतर विद्यार्थ्यांना समजली नाही. त्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेऊन समितीने ऑफलाईन प्रवेश फेरी राबविण्यास काही अधिविभागांना मान्यता दिली. त्याचा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थी संख्येवर चांगला परिणाम झाला आहे.

-डॉ. श्रीकृष्ण महाजन, अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# विद्यापीठातील अधिविभागांत २ हजारांहून विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

## तांत्रिक त्रुटीमुळे दोन दिवस ऑफलाईन प्रवेश

- प्रवेश क्षमता - २९७०
- अर्ज भरलेले विद्यार्थी - ५४५५
- प्रवेश परीक्षा दिलेले विद्यार्थी - ३७३७

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील अधिविभागांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार आतापर्यंत सुमारे २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत.

विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे अर्ज भरताना अनेक त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीने ऑफलाईन प्रवेशफेरी घेण्यास काही अधिविभागांना मान्यता दिली. बुधवार व गुरुवारी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी ऑफलाईन प्रवेश घेतले. विद्यापीठातील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, गणित या अधिविभागांनी सकाळी ११ ते सायंकाळी ६ यावेळेत ऑफलाईन फेरीची प्रक्रिया राबविली. यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६०० ने वाढल्याचे कळते.

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2025 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यास निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत-चीन राजनैतिक संबंध स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चीन सरकारतर्फे भारतीय युवकांसाठी आयोजित विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हे विद्यार्थी २० जून ते ४ जुलै २०२५ दरम्यान चीन दौऱ्यावर जाणार आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये राधिका संदीप पाटील (प्रथम वर्ष, बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी), ओम सचिन कोळेकर (तृतीय वर्ष, बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन) आणि मुकुंद गौतम गायकवाड (प्रथम वर्ष, एम.टेक. एनर्जी टेक्नॉलॉजी) यांचा समावेश आहे. दौऱ्यात बीजिंग, शिजियाझुआंग आणि शांघाय शहरांतील सांस्कृतिक, शैक्षणिक व ऐतिहासिक स्थळदर्शन, चिनी भाषा व संस्कृती वर्ग, चहा संस्कृती अनुभव व भारतीय दूतावास भेट यांचा समावेश आहे. दौऱ्याचा संपूर्ण खर्च चीन सरकार उचलणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

या निवड प्रक्रियेसाठी डॉ. एस. बी. सादळे, डॉ. अजित कोळेकर आणि डॉ. उदय पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

लोकमत

# 'तंत्रज्ञान'चे विद्यार्थी करणार चीनचा सांस्कृतिक अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक संबंध स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चीन सरकारतर्फे भारतीय युवकांसाठी विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यासाठी निवड करण्यात आली. येत्या २० जूनला हे विद्यार्थी चीनला रवाना होणार आहेत.

चीन दौऱ्यासाठी राधिका संदीप पाटील (प्रथम वर्ष, बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी), ओम सचिन कोळेकर (तृतीय वर्ष, बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन) आणि मुकुंद गौतम गायकवाड (प्रथम वर्ष, एम.टेक. एनर्जी टेक्नॉलॉजी) हे २० जून ते ४ जुलै या कालावधीत चीन दौरा करणार आहेत. त्यांना बीजिंग, शिजियाझुआंग आणि शांघाय शहरांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येणार आहे. चिनी भाषा व संस्कृती वर्ग, युवा संवाद मंच, दूतावास भेट अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

20 JUN 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिंड्यांची सांख्यिकी माहिती संशोधकांसाठी उपयुक्त

## 'तरूण भारत संवाद'चे विभागीय संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

पंढरपुरची आषाढी-कार्तिकी एकादशी गेल्या अनेक शतकापासून सुरू आहे. परंतू या वारीतील दिंड्यांची माहिती सांख्यिकी रूपात अद्याप उपलब्ध नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ही माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. ही माहिती भविष्यात तरूण संशोधकांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन 'तरूण भारत संवाद'चे विभागीय संपादक डॉ.श्रीरंग गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र व पुण्यातील आत्मभान संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'वारकरी दिंडी अभ्यास' असा या कार्यशाळेचा विषय होता.

विभागीय संपादक डॉ. गायकवाड म्हणाले, महाराष्ट्रामध्ये राहणाऱ्या व्यक्तीला वारी माहित असतेच. ज्याची मातृभाषा मराठी असते. त्यांच्या बोलण्यात दोन-चार तुकारामाचे अभंगांचे संदर्भ सहज येतात.आषाढी आणि कार्तिकी वारीला पंढरपूरला मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित राहतात. काही लाखात ही संख्या असते. तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना 'तरूण भारत संवाद'चे विभागीय संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड. सोबत संदेश भंडारे, ज्ञानेश्वर बंडकर, डॉ. नंदकुमार मोरे.

पालख्या आषाढीला निघतात. त्यांची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात असते. वारी परंपरेवर अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके आली आहेत. परंतू वारीत या दिंड्या सहभागी होतात, त्याची नेमकी नोंद घेतली गेलेली नाही. मोठ्या संतांच्या पालख्या आणि त्या सोबत चालणाऱ्या दिंड्या यांची थोडी फार माहिती मिळते.पण पंढरपूच्या आषाढी यात्रेकरिता विदर्भ, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण या बाजूने अनेक दिंड्या पंढरपुरात प्रवेश करतात. परंतू या दिंड्यां किती, दिंड्यांमध्ये पुरूष, महिला किती याची माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ दिंड्यांची संख्या मोजणार आहे, हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरणार आहे.

सांगोल्याचे ज्ञानेश्वर बंडगर म्हणाले, जेवढ्या दिंड्या तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात असतात. त्याहून अधिक दिंड्या पंढरपूरमध्ये आषाढीला येतात. त्याची नोंद जर केली तर वारीचा प्रभाव महाराष्ट्रात कुठवर आहे, याची नेमकी माहिती मिळेल. त्यातून वारीबद्दल अधिक व्यापक भाष्य करणे सोपे होईल. पुण्यातील संदेश भंडारे म्हणाले, दिंड्यांची नोंद करण्याची व्यापक मोहिम आखण्याचे नियोजन आत्मभान संशोधन

### इथे होऊ शकतात नोंदी

पुण्याकडून येणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजांची पालखीतील दिंड्यांची नोंद नातेपुते येथे करणे आवश्यक आहे. तुकाराम महाराजांची पालखी सोहळ्यातील दिंड्यांची नोंदणी तोंडले बोंडलेत केली पाहिजे. मराठवाडा आणि विदर्भातून येणाऱ्या दिंड्यांची नोंदणी करकंब, शेटफळ आणि देगाव येथे करण्याचे नियोजन केले आहे. कोकण,गोवा आणि कर्नाटकातून येणाऱ्या दिंड्यांची नोंदणी खर्डीत करणे योग्य होईल. मंगळवेढा मार्गाने येणाऱ्या दिंड्याची नोंद गोपाळपूर येथे करता येईल.

संस्था करत आहे. पंढरपूरमध्ये प्रवेश करताना मुख्य ७ रस्ते आहेत. त्या सात ठिकाणी आपले स्वयंसेवक व एक समन्वयक आपले नोंदणीचे काम करतील. या करीता २० ते २५ स्वयंसेवक आपल्याला हवे आहेत. त्यांना कशी नोंदणी करायची व त्याची आवश्यकता समजून सांगण्याकरिता स्वयंसेवकाची एक कार्यशाळा घेवून त्यांना या संकल्पने मागील भूमिका समजावून सांगणे आवश्यक आहे. राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राचे समन्वयक स्वागत डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सुत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

सकाळ

# 'असे होते आपले शाहू महाराज' चरित्र ग्रंथाचे २६ जूनला प्रकाशन

कोल्हापूर, ता. १९ : राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जन्म वर्षाची आठवण म्हणून शिवाजी विद्यापीठाने शालेय विद्यार्थ्यांसाठी शाहू महाराजांचे चरित्र प्रकाशित करण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार 'असे होते आपले शाहू महाराज' या ग्रंथाचे प्रकाशन २६ जून रोजी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने या चरित्र ग्रंथ लेखनाची जबाबदारी मराठी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांच्यावर सोपविली होती. या ग्रंथात राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रपट अतिशय सुबोध भाषेत साकारला आहे. महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंग, त्यांचे विचार आणि त्यांनी केलेली मोठमोठी कामे गोष्टी रूपात मांडली आहेत. शाहू महाराजांनी सामान्य माणसाला, गोरगरिबांना, स्त्रियांसह, शेतकरी आणि दलित-बहुजनांना न्याय मिळावा, त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी खूप मोठे काम उभारले आहे. या कामाचे स्वरूप एका अभिनव पद्धतीने गोष्टीरूपात येथे वाचायला मिळणार आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. गुरूवारी बीएस्सी.,बीसीए, एमसीए, बी फार्म अशा ५ अभ्यासक्रमाची ५२ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. २ हजार ७७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बीएस्सी, बीसीए, एमसीए, बी. फार्मसी आदी पाच अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध ५३ केंद्रांवर सुरळीत पार पडल्या. परीक्षेला २ हजार ७७ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १९ रोजी बीसीए, डीआयटी (कॉमर्स) आदी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

लोकमत

# नोकरी, व्यवसाय सांभाळून करू शकता ऑनलाइन जर्नालिझम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाइन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेन्ट्री फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग या अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे.

हे अभ्यासक्रम नोकरी, व्यवसाय करत पूर्ण करता येतात. शनिवार व रविवारी प्रशिक्षण दिले जाते. वयाची अट नाही. पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाइन जर्नालिझम हा पदवीनंतरचा एक वर्षाचा कोर्स आहे. या कोर्सला पदवी उत्तीर्ण आवश्यक आहे. सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेन्ट्री फोटोग्राफी व सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे कोर्स तीन महिन्याचे असून, बारावी पास कोणालाही करता येतात. https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/ login वर कागदपत्रे अपलोड करावेत, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

सकाळ

# रोहन कामत यांना पीएच. डी.



रोहन कामत

कोल्हापूर : येथील रोहन संजय कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र या विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी लिथियम आयन बॅटरी या ऊर्जा संचयनाच्या अत्यंत महत्त्वाचे व आधुनिक क्षेत्रात संशोधन करून आपले शैक्षणिक योगदान दिले आहे. राजाराम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. लता जाधव, प्राचार्या डॉ. अनिता बोडके, क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ऑस्ट्रेलियातील प्रा. डॉ. दीपक दुबल यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत



कोल्हापुरातील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलचा जागतिक फार्मासिस्ट दिवस २०२४ पश्चिम विभागीय पारितोषिक मिळाले. यावेळी मदन पाटील, डॉ. एच. एन. मोरे, डॉ. डी. ए. भागवत, आदी उपस्थित होते.

# भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलंचा जागतिक फार्मासिस्ट दिवस २०२४ पश्चिम विभागीय पारितोषिक मिळाले. कोल्हापूर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष मदन पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एन. मोरे, डॉ. डी.ए. भागवत, प्रा. विशिन पाटील यांच्याकडे पारितोषिक देण्यात आले.

सामाजिक उपक्रमाच्या आधारावर महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडून महाविद्यालयास अती उत्तम श्रेणी मिळाली. प्राचार्य डॉ. एच.एन. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाचे निरंतर संलग्नीकरण मिळाले. नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडेशन कौन्सिल नॅक ए प्लस तसेच नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फेमवर्क (एनआयआरएफ) क्रमवारीत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी राष्ट्रीय स्तरावर ८० वे स्थान पटकावले. संस्थेच्या यशाबद्दल संस्थेचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन केले. (वा. प्र.)